**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**नगरसचिव विभाग**

**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -४६**

| | |
|---|---|
| मा.प्रशासक ठराव क्र. ४६६ | विषय क्रमांक- ४६६ |
| दिनांक - ०८ /०५/२०२५ | विभाग - मार्केट विभाग |

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या मालकीचे सावित्रीबाई फुले संकुल हॉल क्र.८ कर्मचारी भविष्य निधी संगठन,जिल्हा कार्यालय या शासकीय कार्यालयास भाडे त्तवावर दिलेले असून सदरच्या कार्यालयाचा भाडे करार नुतनीकरण करणे करीता मा.स्थायी समितीची मान्यता मिळणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,कर्मचारी भविष्य निधी संगठन,जिल्हा कार्यालय,अहिल्यानगर यांना सावित्रीबाई फुले संकुल हॉल क्र.८ नुतनीकरण लवकरात लवकरण बाबत पत्रान्वये कळविले आहे.

कर्मचारी भविष्य निधी संगठन ,जिल्हा कार्यालय,अहिल्यानगर यांनी दि.३/५/२०१८ रोजी सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज -२ मधील हॉल क्र.८ मिळणे बाबत अर्जाव्दारे मागणी केली होती.उक्त अर्जाच्या अनुषंगाने नियमानुसार प्रस्तव सादर करून मा.स्थायी समिती सभा क्र.१ विषय क्रमांक १० दि.२७/६/२०१९ अन्वये रू.२४,८६८/- दरमहा भाडे घेवून ११ वर्ष कराराने नेहमीच्या अटी व शर्तीनुसार भाडे तत्वावर देण्यात यावे,असा ठराव पारित करण्यात आलेला होता.

सदर ठरावाच्या अनुष्ज्ंगाने रू.२४,८६८/-दरमहा भाडे घेवून ११ वर्ष्ज कराराने नेहमीच्या अटी व शर्तीनुसार मा.दुरूयम निबंधक,अहिल्यानगर यांचेकडेस स्वखर्चाने करारनामा करून देणे बाबत अर्जदारास कळविणे बाबत पस्ताव दि.११/७/२०१९ रोजी सादर करण्यात आलेला होता. सदर प्रस्तावावर तत्कालीन मा.आयुक्त यांनी प्रथम ३वर्षासाठी करार करावा,असे आदेशित केलेले आहे. त्यानुसार कर्मचारी भविष्य निधी संगठन,जिल्हा कार्यालय,अहिल्यानगर यांनी दि.१/७/२०१९ ते ३०/६/२०२२ मा.दुय्यम निबंधक अहिल्यानगर यांच्याकडे दस्त क्र.१०४६/२०२१ करण्यात आलेला आहे.

कर्मचारी भविष्य निधी संगटन,जिल्हा कार्यालय ,अहिल्यानगर यांना आपल्या कार्यालयाचा भाडेपट्टा कराराची मुदत ३०जुन २०२२ रोजी संपलेली आहे. तसेच मा.महासभा ठराव क्र.५ दि.१५/०३/२००८ अन्वये दर ३ वर्षानी १५%भाडेवाढ करण्यात येते त्यानुसार १५%भाडेवाढ करून सध्याचे भाडे रू.२८५९८/- इतके येत असून तशी नोंद टाचण रजिस्टरला घेण्यात आलेली आहे. तरी सदरचे भाडे मान्यतेबाबत इकडेस कळविण्या यावे ,असे या विभागाडील जा.क्र.४७२ दि.२६/०२/२०२४ अन्वये कळविण्यात आलेले आहे.

उक्त पत्रास कर्मचारी भविष्य निधी संगठन,जिल्हा कार्यालय ,अहिल्यानगर यांनी पत्रान्वये वाढीव भाडे मान्य असुन नुतनीकरण लवकरात लवकर करणे बाबत कळविले आहे.कर्मचारी भविष्य निधी

संगठन,जिल्हा कार्यालय,या कार्यालयावर जागा भाडे रू.८,६६,७६४/- जी एस टी रू.८४९३६/- व एस जी एस टी रू.८४९३६/- असे तीन्ही मिळून रू. १०,३६,६३६/- इतकी थकबाकी आहे.

--२--

अहिल्यानगर महानगरपालिका मालकीच्या सावित्रीबाई फुले व्यापारी संकुल फेज - २ , हॉल क्र.८ भविष्य निधी संगठन,जिल्हा कार्यालय,अहिल्यानगर हे शासकीय असल्याने यांस तीन वर्षाकरीता नेहमीच्या अटी व शर्तीनुसार दि.१/७/२०२२ पासुन मुदत वाढ देणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---------------------------------------------------------------------------------------------------

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर
## नगरसचिव विभाग
### मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय

**कार्यसूची क्रमांक -४६**

मा.प्रशासक ठराव क्र. ४६७ विषय क्रमांक- ४६७

दिनांक - ०८ /०५/२०२५ विभाग - प्रकल्प विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या चितळे रोड सि.स.नं.२०८ या आरक्षण क्र.२१६ येथे नियोजित भाजी मार्केट व व्यापारी संकुल (नेहरू मार्केट ) या ठिकाणी मनपा मार्फत बांधण्यात आलेली संरक्षण भिंत व पेविंग ब्लॉक चे बांधकाम निर्लेखन करणे बाबत.

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार, अहिल्यानगर महानगरपालिकेच्या चितळे रोड येथे भाजी मार्केट व व्यापारी संकुलाचे काम सुरू करावयाचे आहे. सदर ठिकाणी बांधकाम करणे करीता ठेकेदाराची नियुक्ती करण्यात आली असून ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे.

सदर ठिकाणी नगररचना विभागाचे प्रतिनिधी यांचे समवेत सि.स.नं.२०८ या आरक्षण क्र.२१६ या प्लॉटची मोजणी केली असता प्लॉटच्या पश्चिमेकडील बाजुस व प्लॉटच्या हद्दीमध्ये पक्या स्वरूपाचे बांधकाम व त्यावर लोखंडी ग्रील अशी एका बाजुने संरक्षण भिंत बांधकाम केले आहे. तसेच भिंती लगत प्लॉटच्या हद्दीमध्ये पश्चिम बाजुस पेविंग ब्लॉक बसविण्यात आले आहेत. याबाबत मनपाच्या बांधकाम विभागामार्फत केले आहे.

सदर मनपामार्फत करण्यात आलेले पक्या स्वरूपाचे बांधकाम व त्यावरील लोखंडी ग्रील व एका बाजुने संरक्षण भिंतचे बांधकाम निष्कासीत करून निर्लेखन करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

निर्णयः- महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**
**नगरसचिव विभाग**
**मा.प्रशासक यांजकडील मा. स्थायी समिती विषयांबाबतचे निर्णय**

**कार्यसूची क्रमांक -४६**

मा.प्रशासक ठराव क्र. ४६८ विषय क्रमांक- ४६८
दिनांक - ०८ /०५/२०२५ विभाग - घनकचरा व्यवस्थापन विभाग

---

**विषय :-** अहिल्यानगर महानगरपालिका मालकीच्यचा बुरूडगांव येथील जैव वैदयकीय कचरा संकलन व विल्हेवाट करणे कामी मे. बायोक्लिन सिस्टीम्स (इंडिया ) प्रा.ली.पुणे या संस्थेस मुदतवाढ मिळणे बाबत..

--**--

**ठराव :-** विभागाने प्रस्तावित केल्यानुसार,अहिल्यानगर महानगरपालिका मालकीच्या बरूडगांव स.नं. ३४ येथे जैव वैदयकीय कचरा विल्हेवाट करणेकामीचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. देखभाल दुरूस्ती करणे कामी ई निविदा प्रक्रिया राबवून मे.बायोक्लीन सिस्टीम (इंडिया ) प्रा.ली.पुणे या संस्थेस दि.२१/०७/२०२३ अखेर ५ वर्षाकरीता कार्यारंभ देण्यात आला होता. तद्नंतर सदर संस्थेने कोविड-१९ कालावधी मध्ये झालेल्या अतिरीक्त खर्चा मुळे त्यांचा झालेला आर्थिक तोटा भरून काढणे करीता सदर संस्थेने पाच वर्ष मुदतवाढ देणे बाबत विनंती पत्र सादर केले आहे. मा.आयुक्त यांनी सदर संस्थेने कोविड -१९ कालावधीमध्ये काम समाधानकारक असल्यामुळे मा.आयुक्त यांनी दिनांक २२ जुलै २०२३ ते २१ जुलै २०२५ अखेर दोन वर्ष कालावधी करीता प्रथम मुदतवाढ देण्यात आली आहे. सदर संस्थेची मुदत दि.२१ जुलै २०२५ अखेर संपुष्टात येत आहे. मे बायोक्लीन सिस्टीम (इंडिया ) प्रा.ली.पुणे या संस्थेने तीन वर्ष कालावधी करीता मुदतवाढ मिळणे बाबत विनंती पत्र सादर केले आहे.

सदर पत्रामध्ये असे नमुद केलेले आहे की, कोविड -१९ कालावधीमध्ये झालेल्या अतिरीक्त खर्चाची भरपाई झालेली नाही. तसेच मुदतवाढ मिळाल्यापासुन प्रकल्पावरील यंत्र सामुग्रीमध्ये महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचे सुचनांनुसार बदल करून घेण्यात आलेले आहेत. सदर केलेल्या बदलांमुळे अतिरीक्त खर्च करावा लागत आहे. तसेच महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडील सुचने प्रमाणे जैव वैदयकीय कचरा संकलन करतेवेळी वजन करून घेणे बंधनकारक असल्यामुळे आवश्यक असल्यामुळे कचरा संकलनासाठी पूर्वीपेक्षा जास्त वेळ लागत आहे. तसेच जैव वैदयकीय कचरा संकलन हे २४ तासांच्या आत करणे आवश्यक असल्यामुळे २४ तासांच्या आत होणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर संस्थेस संकलनाकामी वाहनांची संख्या वाढवावी लागणार आहे. सदर सर्व कामांकरिता दिड पट खर्च वाढ होणार आहे.

अहिल्यानगर महानगरपालिका मालकीच्या बरूडगांव स.नं. ३४ येथे जैव वैदयकीय कचरा विल्हेवाट करणेकामीचा प्रकल्प उभारण्यात आलेला आहे. महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांनी या प्रकल्पाबाबत केलेल्या सुचने नुसार प्रकल्पामध्ये नुतनीकरण व काही प्रमाणात बदल केल्यामुळे सर्व कामांकरिता ऑपरेटर कडून दिड पट खर्च झालेला आहे. व्यापक जनहित व मनपाचा अनुषंगिक आर्थिक फायदा लक्षात घेता या झालेल्या अतिरीक्त खर्चाची भरपाई झालेली नसल्याने मे.बायोक्लीन सिस्टीम (इंडिया ) प्रा.ली.पुणे या संस्थेस तीन वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देण्यास तसेच प्राप्त होणा-या रॉयल्टीच्या रकमेवर प्रतिवर्षी १% दरवाढी बाबतच्या प्रस्तावास अखेर मंजुरीस मा.प्रशासक सर्वसाधारण सभेपुढी सादर करणेस मा.प्रशासक यांची मंजुरी देणेत येत आहे.

---

**निर्णयः-** महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग,शासन आदेश क्रमांकः एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१ / नवि १४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.२८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
**(मेहेर लहारे)**
प्र.नगरसचिव
अहिल्यानगर महानगरपालिका,

सही/-
**(यशवंत डांगे)**
मा.प्रशासक,
अहिल्यानगर महानगरपालिका